Gram: "Dnyanteerth"

**Swami Ramanand Teerth Marathwada University**

*"Dnyanteerth", Vishnupuri,*

**Nanded - 431 606 (M.S.)**

तार: " ज्ञानतीर्थ "

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ**

*"ज्ञानतीर्थ", विष्णुपूरी,*

**नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र)**

संदर्भ : परीक्षा/२०१५–१६/1255

दिनांक : २३/०६/२०१५

## सुचना

उन्हाळी २०१५ मध्ये झालेल्या परीक्षे संदर्भात गुण पडताळणी, उत्तर पुस्तिकांची छायांप्रत व पुनर्मुल्यांकन आवेदनपत्र सादर करण्याबाबत. विद्यार्थी व महाविद्यालयांना मार्गदर्शक सुचना.

अभ्यासक्रमांचे नांव :– BA, B.COM, B.SC, BBA, BSW, BA(Fashion design), BA(Animation), BA(Lalit kala),B.Sc- BT, B.Sc – BioInfor, B.Sc- Soft Engg, B.Sc- IT, B.Sc NT, BCA, BCS – तृतीय वर्षाकरिता गुण पडताळणी, उत्तर पुस्तिकेची छायांप्रत व पुनर्मुल्यांकन आवेदनपत्र महाविद्यालयांनी स्विकारावेत.

०१. गुणदान संदर्भात तक्रार निवार पध्दती बाबत.

अ) १ गुण पडताळणी (व्हेरीफीकेशन) रू. ७५/– प्रती पेपर
२ उत्तर पुस्तिकांची छायांकीत प्रत रू. ३५०/– प्रती पेपर
३ छायांकीत प्रती नंतरचे पुनर्मुल्यांकन रू. १५०/– प्रती पेपर
४ थेट /सरळ पुनर्मुल्यांकन रू. ३५०/– प्रती पेपर

जे विद्यार्थी उत्तर पुस्तिकांची छायांप्रतीसाठी अर्ज करतील अशा विद्यार्थ्यांना थेट / सरळ पुनर्मुल्यांकनाकरिता अर्ज करता येणार नाही. तसेच जे विद्यार्थी थेट / सरळ पुनर्मुल्यांकनाकरिता अर्ज करतील त्यांना उत्तर पुस्तिकेच्या छायांप्रतीसाठी अर्ज करता येणार नाही. असे केल्यास केवळ सरळ मुल्याकंनाचा अर्ज ग्राहय धरण्यात येईल व छायांप्रतीसाठी केलेला अर्ज आपोआप रद्द होईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. एका सत्रासाठी जास्तीत जास्त दोन विषयासाठी पुनर्मुल्याकंनाचा अर्ज करता येईल.

ब) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात गुणपडताळणी, उत्तर पुस्तिकांच्या छायांकीत प्रत, सरळ पुनर्मुल्यांकनांचे आवेदनपत्र सादर करण्याचा दि. **०१.०७.२०१५** असून, या तारखे नंतर कुठल्याही परीस्थीतित आवेदनपत्र स्विकारली जाणार नाहीत.

क) महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून प्राप्त शुल्कांचा धनाकर्ष काढण्याचा दि.**२.०७.२०१५.**

ड) महाविद्यालयाने धनाकर्ष व आवेदनपत्र विद्यापीठात सादर करण्याचा दि.**३.०७.२०१५.**

ई) महाविद्यालयाने विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या उत्तर पुस्तिकांच्या छायांकीत प्रती संबंधीत विद्यार्थ्यांना त्वरीत वितरीत करून सदर छायाप्रती प्राप्त झाल्यापासून पाच दिवसात इच्छूक विद्यार्थ्यांचे पुनर्मुल्यांकनाचे अर्ज विहीत शुल्कासह (रू. १५०/– प्रती विषय) स्वीकारून ते दोन दिवसात विद्यापीठात सादर करावेत.

०२. वर नमुद केलेले विहीत आवेदनपत्र विद्यापीठ प्रकाशन विभागात रू. ५/– भरून घ्यावेत. अथवा विद्यापीठाच्या संकेत स्थळावरून (www.srtmun.ac.in.) डाउन लोड करून घेता येईल. जे विद्यार्थी सदर आवेदनपत्र संकेत स्थळावरून घेतील त्यांचे शुल्क रू. ५/– अधीकचे भरून घ्यावेत.

०३. वरील आवेदनपत्रे महाविद्यालयांनी केवळ खास दुतामार्फतच पाठवावीत पोष्टाने किंवा अन्य मार्गाने आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

**प्र. परीक्षा नियंत्रक**